जिल्हा व सत्र न्यायालय, अकोला
रेल्वे स्टेशन रोड, रामदास पेठ, अकोला ४४४००१
दुरध्वनी क्र. ०७२४—२४१०३८९
E-mail : mahakodc@mhstate.nic.in
निविदा क्रमांक DC/TENDER/01/2025 दिनांक ०१/०७/२०२५

निविदा सुचना

जिल्हा न्यायालय अकोला, येथील जिल्हा न्यायालयाकरीता ०१ माळी (बागकामगार) पदाच्या सेवा दोन वर्षाच्या कालावधीकरीता शासनमान्य नोंदणीकृत कंत्राटदारांकडून कंत्राटी सेवेने (Outsourcing) सेवासंविदा करार करणेसाठी निविदा/दरपत्रक Off Line पध्दतीने विहीत नमुन्यात दरपत्रक/निविदा सिलबंद स्वरुपात मागविण्यात येत आहेत.

विस्तृत निविदा सुचना व त्यासबंधीच्या अटी व शर्ती **दिनांक ०७/ ०७/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजेपासून ते दिनांक १८/०७/२०२५ रोजी सायंकाळी ०५.३० वाजेपावेतो** जिल्हा व सत्र न्यायालय, अकोला चे https://akola.dcourts.gov.in ह्या संकेतस्थळावर तसेच जिल्हा व सत्र न्यायालय,अकोला यांचे सुचना फलकावर उपलब्ध आहेत.

अकोला.
दिनांक:— ०१/०७/२०२५.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश
अकोला

जिल्हा व सत्र न्यायालय, अकोला
निविदा सूचना

जिल्हा व सत्र न्यायालय अकोला, येथील कार्यालयाकरीता **माळी (बागकामगार)** 01 पदाची सेवा दोन वर्षाच्या कालावधीकरीता शासनमान्य नोंदणीकृत कंत्राटदारांकडून कंत्राटी सेवेने (Outsourcing) सेवासंविदा करार करणेसाठी दोन लिफाफा तांत्रिक निविदा लिफाफा (Technical Bid Envelop) व आर्थिक निविदा लिफाफा (Financial Bid Envelop) निविदा/दरपत्रक Off Line पध्दतीने विहीत नमुन्यात सिलंबद स्वरुपात मागविण्यात येत आहेत. त्याबाबत, तपशील परिशिष्ट – अ मध्ये आहे.

परिशिष्ट – अ

१	निविदा/दरपत्रक प्रसिद्धी	दि.०७.०७.२०२५ वेळ १०.३०
२	निविदा/दरपत्रक सादर करण्याचा दिनांक	दि. ०७.०७.२०२५ वेळ १०.३० पासून
३	निविदा/दरपत्रक भरण्याचा/सादर करण्याचा अंतिम दिनांक	दि. १८.०७.२०२५ वेळ सायंकाळी ०५.३० वाजे पर्यत
४	तांत्रिक लिफाफा व आर्थिक दराचा लिफाफा सादर करण्याचा दिनांक	दि.०७.०७.२०२५ वेळ १०.३० पासून ते दि.१८.०७.२०२५ सायंकाळी ५.३० वाजेपर्यत.
५	तांत्रिक लिफाफा व आर्थिक दराचा लिफाफा सादर करण्याचे ठिकाण	मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, रेल्वे स्टेशन रोड,रामदासपेठ अकोला ४४४००१
६	लिफाफे उघडण्याचा दिनांक व ठिकाण	दि.२२.०७.२०२५ वेळ दुपारी २.१५ वाजता नविन अतिरीक्त इमारत, कॉन्फरन्स हॉल, चौथा मजला, जिल्हा व सत्र न्यायालय, अकोला काही तांत्रीक अडचणी निर्माण झाल्यास समिती ठरवेल त्या दिवशी.

निविदा क्रमांक	कामाचे नांव	कामाचे अंदाजे किंमत रुपये	नोंदणीकृत कंत्राटदाराने भरावयाची बयाणा रक्कम D.D/ धनाकर्षाव्दारा	कामाचा कालावधी	निविदा अर्जाची किंमत Cash/रोख
०१/२५	जिल्हा न्यायालय अकोला, येथील परिसरातील अस्तित्वात असलेल्या झाडांची देखभाल व नव्याने फुलझाडे लावुन परिसरात बगिचा निर्माण करुन सुशोभित करण्यासाठी ०१ माळी (बागकामगार) मनुष्यबळाची सेवा पुरविण्याकरीता शासनमान्य नोंदणीकृत कंत्राटदाराकडून कंत्राटी सेवेने (Outsourcing) दोन वर्षाच्या कालावधीसाठीचा सेवासंविदा करार करणेसाठी विहीत नमुन्यात निविदा **ऑफ लाईन/ Off Line** दोन लिफाफा पद्धतीने सिलंबद स्वरुपात मागविण्यात येत आहेत.	Rs.521770/-	Rs.20,000/-	०२ वर्ष दोन वर्ष	Rs.1,000/-

१. उपरोक्त निविदा सूचनेतील अधिक माहितीकरीता इच्छूक निविदाधारकांनी संकेतस्थळ https://akola.dcourts.gov.in येथे भेट द्यावी.

२. सहभागी होणाऱ्या निविदाकारांनी ऑफलाईन निविदा सादर करण्यासाठी दरपत्रक फी **रुपये १,०००/— प्रती निविदा रक्कम ना—परतावा Cash/रोख स्वरुपात** वित्त विभाग, जिल्हा न्यायालय,अकोला येथे भरावी.
तसेच बयाना/अनामत **रक्कम रु २०,०००/—(रुपये वीस हजार फक्त) धनाकर्ष/Demand Draft हा District Judge-1, Akola** या नावाने दयावा. जर बयाना/अनामत रक्कम भरणे पासुन कायदेशीर सुट असेल तर त्या बाबतचे कागदपत्रे तांत्रिक लिफाफ्या सोबत दाखल करावे.

३. निविदा/दरपत्रक व प्रक्रीयेबाबतची माहिती https://akola.dcourts.gov.in संकेतस्थळावर तसेच जिल्हा न्यायालय,अकोला येथील सुचना फलकावर उपलब्ध आहे.

४. **दोन्ही लिफाफे सादर करतांना लिफाफ्यावर स्पष्ट व ठळक अक्षरात तांत्रिक निविदा लिफाफा (Technical Bid Envelop) व आर्थिक निविदा लिफाफा (Financial Bid Envelop) असे नमुद करणे आवश्यक आहे. दरपत्रक/निविदा हया मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,जिल्हा व सत्र न्यायालय,रेल्वे स्टेशन रोड,रामदास पेठ अकोला.४४४ ००१ यांचे नावाने नमुद कालावधीत पाठवावे.**

५. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी रद्द ठरविण्याचा अधिकार माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अकोला यांनी राखून ठेवलेला आहे.

अकोला
दिनांक:— ०७/०७/२०२५

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अकोला

परिशिष्ट ब

जिल्हा व सत्र न्यायालय अकोला, येथील कार्यालयाकरीता माळी (बागकामगार) 01 पदाची सेवा दोन वर्षाच्या कालावधीकरीता शासनमान्य नोंदणीकृत कंत्राटदारांकडून कंत्राटी सेवेने अंदाजपत्रकानुसार निश्चित केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

अक्र.	कामाचे नाव	कामाचे स्वरूप	पदसंख्या	वार्षिक रक्कम दोन वर्षाकरीता
१	जिल्हा न्यायालय अकोला, येथील परिसरातील अस्तित्वात असलेल्या झाडांची देखभाल व नव्याने फुलझाडे लावुन परिसरात बगिचा निर्माण करुन सुशोभित करण्यासाठी ०१ माळी (बागकामगार) मनुष्यबळाची सेवा पुरविण्याकरीता शासनमान्य नोंदणीकृत कंत्राटदाराकडून कंत्राटी सेवेने (Outsourcing) दोन वर्षाच्या कालावधीसाठीचा सेवासंविदा करार करणेसाठी विहीत नमुन्यात निविदा Off Line ऑफलाईन दोन लिफाफा पद्धतीने सिलबंद मागविण्यात येत आहेत.	जिल्हा न्यायालय अकोला, येथील परिसरातील अस्तित्वात असलेल्या झाडांची देखभाल व नव्याने फुलझाडे लावुन परिसरात बगिचा निर्माण करुन सुशोभित करण्यासाठी ०१ माळी (बागकामगार) मनुष्यबळाची सेवा शासनमान्य नोंदणीकृत कंत्राटदाराकडून कंत्राटी सेवेने कंत्राटी पदधतीने उपलब्ध करून देणे.	01(एक)	Rs.395280/-
2	बागकामा करीता साहीत्याचा खर्च १०%	-----		Rs.39528/-
3	अनुक्रमांक १ + २	-------	----- --	Rs.434808/-
4	विमा २% क्रमांक ३ वर	-------	----- --	Rs. 8696.16
5	वस्तु व सेवा कर १८ % क्रमांक ३ वर			Rs.78265.44
6	दोन वर्षाकरीता एकूण रक्कम (3 to 5)	--------	----- --	Rs.521769.60 **R/of.. Rs.521770/-**

जिल्हा व सत्र न्यायालय, अकोला

रेल्वे स्टेशन रोड, रामदास पेठ, अकोला ४४४ ००१.

दुरध्वनी क्रमांक ०७२४—२४१०३८९ व २४११७८४

ई-मेल mahakodc@mhstate.nic.in

वि व र ण प त्र

१	निविदा कंत्राटदाराचे/संस्थेचे/कंपनीचे नाव		
२	निविदाकाराकडे माळी (बागकामगार) पदाच्या कामाचा पूर्वीचा अनुभव आहे काय? सद्यस्थितीत कोणकोणत्या संस्थेत सेवा काम चालू आहे असल्यास कार्यारंभ आदेशाची प्रत.		
३	निविदाकाराने स्वत:वर कोणताही गुन्हा दाखल नसल्याबाबतचे तसेच त्याच्या संदर्भात कोणतेही प्रकरणे न्यायालयात प्रलंबित नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. ५००/— च्या स्टॅम्प पेपरवर दाखल करावे.		
४	निविदाकाराने खालील बाबींची पूर्तता केली काय?		
	१	कंपनी/संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत (Registration Certificate)	
	२	कंपनी/संस्थेचे वस्तू व सेवा कराच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत (GST Registration)	
	३	कंपनी/संस्थेचे मागील तीन आर्थिक वर्षाच्या आयकर प्रमाणपत्राची छायांकित प्रत	
	४	कंपनी/संस्थेचे ई.एस.आय.सी. प्रमाणपत्राची छायांकित प्रत (Employees State Insurance Corporation)	
	५	कंपनी/संस्थेचे पी.एफ. प्रमाणपत्राची छायांकित प्रत (Provident Fund)	
	६	कंपनी/संस्थेचे प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्राची छायांकित प्रत (सन २०२४—२०२५ या वर्षाचे ना—देय प्रमाणपत्र) (Professional Tax)	
	७	कंपनी/संस्थेचे पॅन/टॅन कार्डची छायांकित प्रत (PAN Card, TAN Card)	
	८	निविदा फार्म खरेदी केल्याची पावती तसेच बयाना/अनामत Demand Draft/ धनाकर्ष जोडला आहे काय?	
	९	निवीदा धारकाने माळी (बागकामगार) किंवा तत्सम प्रकारचे कर्मचा—यांची सेवा केंद्रशासन, महाराष्ट्र शासन वा इतर आस्थापनांमध्ये पुरविले असल्यास संबंधित कार्यालयाचे जारी केलेले कार्यादेश आणि कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करावे अनुभव प्रमाणपत्र (Experience Certificate) जोडले आहे काय?	

उपरोक्त नमुद कागदपत्रे तांत्रिक निविदा (लिफाफा क्रमांक ०१/Technical Bid Envelop) मध्ये कागदपत्रांवर १ ते ९ अनुक्रमांक नमुद करुन सिलबंद सादर करण्यांत यावी.

दिनांक :

निविदाकाराचे नाव व सही

आर्थिक निवीदा (लिफाफा क्रमांक ०२)

१) निविदा मागविणाऱ्या कार्यालयाचे नाव :— जिल्हा व सत्र न्यायालय, अकोला

२) कामाचे स्वरुप :— जिल्हा न्यायालय अकोला, येथील परिसरातील अस्तित्वात असलेल्या झाडांची देखभाल व नव्याने फुलझाडे लावुन परिसरात बगिचा निर्माण करुन सुशोभित करण्यासाठी ०१ माळी (बागकामगार) मनुष्यबळाची सेवा पुरविण्याकरीता शासनमान्य नोंदणीकृत कंत्राटदाराकडून कंत्राटी सेवेने (Outsourcing) कंत्राटी सेवा उपलब्ध करुन देणे.

३) निविदा/दरपत्रक क्रमांक :— ०१/२०२५—२०२६

४) दरपत्रकदार/कंत्राटदाराच्या संस्थेचे/कंपनीचे नाव :—

५) दरपत्रकदार/कंत्राटदाराच्या संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण पत्ता :—

६) दरपत्रकदार/कंत्राटदाराच्या संस्थेचा/कंपनीचा दूरध्वनी/संकेतस्थळ/ई—मेल आयडी :—

७) दरपत्रकदार /कंत्राटदाराच्या संस्थेचा/कंपनीचा नोंदणी क्रमांक :—

८) दरपत्रकदार/कंत्राटदाराच्या संस्थेचा/कंपनीचा वस्तू व सेवा कर (GST Registration) क्रमांक :—

प्रपत्र — १

अ क्र	कामाचे स्वरुप	पदसंख्या	कंत्राटी सेवा पुरविण्यासाठी कंत्राटदाराने मागणी केलेली एकुण रक्कम (२ वर्षा करीता खर्च) सर्व करा व्यतिरिक्त	वस्तू व सेवा कर GST (२ वर्षा करीता खर्च)	एकूण रक्कम (रुपये) (स्तंभ ४+५)	एकूण रक्कम (रुपये) अक्षरी
१	२	३	४	५	६	७
१	जिल्हा न्यायालय अकोला, येथील परिसरातील अस्तित्वात असलेल्या झाडांची देखभाल व नव्याने फुलझाडे लावुन परिसरात बगिचा निर्माण करुन सुशोभित करण्यासाठी ०१ माळी (बागकामगार) मनुष्यबळाची सेवा पुरविण्याकरीता शासनमान्य नोंदणीकृत कंत्राटदाराकडून कंत्राटी सेवेने (Outsourcing) दोन वर्षाच्या कालावधीसाठीचा सेवासंविदा करार करणेसाठी विहीत नमुन्यात निविदा Off Line ऑफलाईन दोन लिफाफा पद्धतीने सिलबंद मागविण्यात येत आहेत.	०१ (एक) माळी (बागकामगार)				

९) दरपत्रकाची/निविदेची दोन वर्षासाठी होणारी एकूण रक्कम रु.....
(अक्षरी .....)

(दरपत्रकदार/कंत्राटदाराचे नाव, सही, शिक्का,

दिनांक

अ) स्तंभ क्र. ४ ते ७ मधील माहिती कंत्राटदारांनी भरावयाची आहे.

जिल्हा व सत्र न्यायालय, अकोला
रेल्वे स्टेशन रोड, रामदास पेठ, अकोला ४४४ ००१.
दुरध्वनी क्रमांक ०७२४—२४१०३८९
ई-मेल mahakodc@mhstate.nic.in

अटी व शर्ती

(१) कंत्राटदार हे जिल्हा न्यायालय अकोला, येथील परिसरातील अस्तित्वात असलेल्या झाडांची देखभाल व नव्याने फुलझाडे लावुन बगिचा निर्माण करुन परिसर सुशोभित करण्यासाठी ०१ माळी (बागकामगार) यांची नियुक्ती करतील. त्यांचे कडून दैनंदिन परिसरातील झाडांची देखभाल व नव्याने फुलझाडे लावुन परिसर स्वच्छ व सुशोभित करण्यासाठी त्यांची नियमित सेवा सकाळी ०९.३० ते सायंकाळी ०५.३० पर्यंत असेल.

(२) कंत्राटदाराकडून नियुक्ती करण्यात येणा—या कर्मचा—याकडे माळी (बागकामगार) पदाच्या कामाचा कमीत कमी तीन वर्षाचा अनुभव असणा—या कर्मचा—यांस प्राधान्य देण्यात यावे.

परिशिष्ट — क

क्र.	कामाबाबतचा तपशील	कर्तव्याची वेळ	कामाचे स्वरुप
१.	जिल्हा न्यायालय अकोला, येथील परिसरातील अस्तित्वात असलेल्या झाडांची देखभाल व नव्याने फुलझाडे लावुन परिसरात बगिचा निर्माण करुन परिसर सुशोभित करणे	सकाळी ०९.३० ते सायंकाळी ०५.३०	०१.दररोज फुल झाडांना पाणी देणे ०२.दररोज झाडांची देखभाल व निगा राखणे. ०३. फुलझाडांची तसेच मोठया झाडांची वेळोवेळी कटींग करणे. ०४.झाडांना खतपाणी देणे व आवश्यक असल्यास फवारणी करणे.

३) निविदा सूचनेमध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार निविदा पुस्तिका फॉर्म (Form) खरेदी /निविदा भरणे/निविदा समाविष्ट करणे/सेवा शुल्क जमा करणे/बयाना/अनामत रक्कम जमा करणे ही सर्व प्रक्रिया विहित वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे याची दरपत्रकधारकांनी/निविदाकारांनी नोंद घ्यावी.

४) निविदा दोन लिफाफा ऑफलाईन पद्धतीने सिलंबद स्वरुपात मागविण्यात येत आहे. (तांत्रिक व आर्थिक निविदा प्रपत्र १ विहीत नमुन्यातच असावी.)

५) कंत्राटदारास तो उपलब्ध करुन देत असलेल्या कंत्राटी सेवांसाठी शासन निर्णय क्र. पदनि/२५१२/प्र.क्र./ १५७, का—१२, दिनांक २७—०२—२०१३, २६—०२—२०१३, ०६—०३—२०१३, **१९—०३—२०१४, १६—०७—२०१४,** ०३—०९—२०१४ व २७—०१—२०१५ व शासन निर्णय क्रमांक : कंत्राटी २०१६/प्रक्र १९४/का.१२, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७, कंत्राटी—२०१७/प्र.क्र.१४/का.१२ दि. ०३.०३.२०१७ व या संदर्भात वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सर्व शासन निर्णयातील (सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.) निर्देशाचे काटेकोरणे पालन करणे बंधनकारक आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

६) प्रपत्र — १ मधील स्तंभ क्र. ४ ते ७ मधील माहिती दरपत्रकधारकांनी/कंत्राटदारांनी भरावयाची आहे.

७) कंत्राटदारांनी त्यांच्यामार्फत सदरील कामासाठी नियुक्त केलेल्या कामगारांना द्यावयाच्या वेतनाची रक्कम व अतिकालिक भत्त्याची रक्कम ही किमान वेतन कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी नसावी.

८) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने त्यांचे नोंदणी प्रमाणपत्र, वस्तू व सेवाकराचे प्रमाणपत्र, मागील तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र, पॅन कार्ड, ई.एस.आय.सी. प्रमाणपत्र, पी.एफ. प्रमाणपत्र, प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्र इत्यादीच्या स्वाक्षांकित छायांकित प्रती तसेच **निविदा फार्म खरेदी केल्याची पावती आणि बयाना रक्कम धनाकर्ष/ Demand Draft निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे.** सदर प्रमाणपत्रांच्या व कागदपत्रांच्या छायांकित प्रती न जोडल्यास त्यांचे निविदा अर्ज रद्द ठरविण्यात येतील.उपरोक्तनमुद सर्व कागदपत्रे तांत्रिक दरपत्रक (लिफाफा क्रमांक ०१/Technical Bid Envelop) मध्ये सिलबंद सादर करण्यांत यावी. नमुद प्रमाणपत्रांशिवाय इतर दस्तऐवज जोडू नये.

९) सर्व प्रथम तांत्रीक लिफाफा उघडण्यांत येईल तांत्रीक लिफाफा उघडतांना दरपत्रकदार/निविदाधारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी हजर राहणे आवश्यक आहेत व त्यावेळेस त्यांनी प्रमाणपत्राच्या मुळ प्रती पडताळणी साठी हजर ठेवणे आवश्यक आहे. जर दरपत्रकदार/निविदाकार तांत्रीक दरपत्रक/निविदेमध्ये नमुद केलेल्या बाबींची पुर्तता करीत नसेल तर त्यांचे दरपपत्रक/निविदा अपात्र ठरविण्यांत येईल व सदर दरपत्रकदार/निविदाकाराची आर्थीक दरपत्रक/निविदा पुढील कार्यवाहीसाठी ग्राहय धरण्यांत येणार नाही. पात्र ठरणा—या दरपत्रकदारांचीच/निविदाकारांचीच आर्थीक दरपत्रक/निविदा उघडण्यांत येईल. **आर्थिक दरपत्रकामधील/निविदेमधील रक्कम तांत्रीक दरपत्रकामध्ये/निविदेमध्ये (लिफाफा क्रमांक ०१/Technical Bid Envelop) नमुद करण्यांत येवू नये जर तसे आढळल्यास सबंधीत दरपत्रकधारकांची/निविदाधारकांची दरपत्रक/निवीदा बाद ठरविण्यांत येईल.**

१०) आर्थिक दरपत्रकामध्ये/निविदेमध्ये **(लिफाफा क्रमांक ०२/**Financial Bid Envelop) दरपत्रकदाराने/निविदाकाराने नमुद केलेले दर दरपत्रकामधील/निविदेमधील सर्व अटी व शर्तींची पुर्तता करीत असेल तर पुढील कार्यवाहीसाठी दरपत्रक/निविदा ग्राहय धरण्यात येईल.

११) सदर कामाकरिता कंत्राटदार यांना देय मोबदला हा एक महिन्याचा कालावधी संपल्यानंतर देण्यात येईल. काही तांत्रिक अथवा अपरिहार्य कारणास्तव मोबदला देण्यास उशिर झाल्यास सदर रकमेवर व्याज देय राहणार नाही. तसेच देण्यात येणाऱ्या मोबदल्यावर कर भरण्याची जबाबदारी सर्वस्वी कंत्राटदार यांची राहील.

१२) माळी (बागकामगार) यांच्या कामाच्या वेळा हया सकाळी ०९.३० ते सायंकाळी ०५.३० पर्यंत राहतील तसेच सुट्टीच्या दिवशी देखील गरज भासल्यास काम करावे लागेल. कंत्राटदारांचेवतीने नेमण्यात आलेल्या माळी (बागकामगार) यांनी गणवेषात व ओळखपत्रांसहीत हजर रहावे लागेल नसल्यास त्यांना परिशिष्ट ड प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

१३) कंत्राटदारास त्याने सदरील कामासाठी नेमलेल्या कंत्राटी माळी (बागकामगार) यांना किमान वेतन अधिनियम, १९४८ मधील तरतुदीनुसार वेतन, महागाई भत्ता, इतर भत्ते व सवलती लागू करणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल.

१४) कामासाठी कंत्राटदारामार्फत नियुक्त केल्या जाणाऱ्या माळी (बागकामगार) यांना अदा करावयाची वेतनाची रक्कम ही किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार कंत्राटदारांकडून कंत्राटी माळी (बागकामगार)यांना देय असलेले किमान वेतन + विशेष भत्ता + बोनस + भविष्य निर्वाह निधी + राज्य कामगार विमा योजनेत जमा करावयाची रक्कम + उपदान इत्यादी मिळून होणारी रक्कम माळी (बागकामगार) यांना अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

१५) कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी माळी (बागकामगार) यांना किमान वेतनकायद्यातील तरतुदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले तर संबंधित कंत्राटदारावर किमान वेतन कायद्यातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व त्याचे कंत्राट तात्काळ रद्द करुन त्याचे नाव काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्याअनुषंगाने कंत्राटदार यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबतच्या किंवा सेवेबाबतच्या कोणत्याही तक्रारी या कार्यालयाकडे येणार नाही, याची त्यांनी दखल घ्यावी.

१६) कंत्राटदारामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी माळी (बागकामगार) यांना कामाचे वेतन व त्या अनुषंगिक इतर सर्व भत्ते रोख स्वरुपात अदा न करता संबंधित कंत्राटी माळी (बागकामगार) यांचे नावाने Account Payee Cross Cheque द्वारेच (रेखांकित धनादेशाद्वारेच) कंत्राटदार अदा करतील, त्याचे उल्लंघन करणार नाहीत किंवा ई.सी.एस.द्वारे/एन.ई.एफ.टी. द्वारे त्यांचे बँक खात्यात जमा करावेत.

१७) कंत्राटदाराने त्यांच्यामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी माळी (बागकामगार)यांना दिलेल्या वेतनाच्या/इतर भत्त्यांच्या धनादेशाची (चेकची) छायांकित प्रत किंवा ई.सी.एस. द्वारे/एन.ई.एफ. टी. द्वारे वेतनाची रक्कम/ इतर भत्त्याची रक्कम कंत्राटी माळी (बागकामगार) यांच्या खात्यात जमा केल्याचे दर्शविणारे बँक अधिकाऱ्याचे सहीचे विवरणपत्र (Statement) किंवा कंत्राटी माळी (बागकामगार) यांची स्वाक्षरी असलेले वेतन देयक (ज्यावर सदर धनादेश क्रमांक/ई.सी.एस. क्रमांक/एन.ई.एफ.टी. क्रमांक लिहिलेला असेल) हे कंत्राटदाराने दरमहा संबंधित कार्यालयास सादर करावें, जोपर्यंत कंत्राटदार वरील कागदपत्रे संबंधित कार्यालयास सादर करणार नाही तोपर्यंत त्या महिन्याचे कंत्राटदाराचे देयक अदा करण्यात येणार नाही.

१८) दुसऱ्या व चौथ्या शनिवारी (कार्यालय बंद असेल त्या दिवशी) माळी (बागकामगार) कामावर बोलाविण्यात आले नसल्यास त्यांचे वेतन कापून घेण्यात येऊ नये. तथापि, दुसऱ्या व चौथ्या शनिवारी (कार्यालय बंद असेल त्या दिवशी) माळी (बागकामगार) यांना काम करण्यासाठी कार्यालयात बोलाविण्यात आले तर त्यांना कार्यालयात येणे बंधनकारक राहिल व त्यासाठी त्यांना वेगळा मोबदला मिळणार नाही. किमान वेतन कायद्यातील तरतुदीप्रमाणे कंत्राटी माळी (बागकामगार)यांना दर आठवड्यास एक (रविवार) भरपगारी सुट्टी देणे ही बाब कंत्राटदार यांचेवर बंधनकारक राहिल.

१९) सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी माळी (बागकामगार) यांना कामावर बोलाविण्यात आले नसल्यास त्यांचे त्या दिवसाचे वेतन कापून घेण्यात येऊ नये. तथापि सार्वजनिक सुट्टींच्या दिवशी माळी (बागकामगार) काम करण्यासाठी कार्यालयात बोलाविण्यात आले तर त्यांना कार्यालयात येणे बंधनकारक राहिल व त्याऐवजी त्या कंत्राटी माळी (बागकामगार) यांना बदली रजा अथवा किमान वेतन अधिनियम व कामगार कायद्यानुसार देय असलेले त्या दिवसाचे वेतन यापैकी कोणताही एक पर्याय निवडता येईल. माळी (बागकामगार) बदली रजेच्या/गैरहजेरीच्या दिवशी दुसरा माळी (बागकामगार) उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माळी (बागकामगार) यांना किमान वेतन कायदा व कामगार कायद्यातील तरतुदीनुसार योग्य ते वेतन संबंधित कंत्राटदाराकडून अदा करण्यात येईल.

२०) कंत्राटी माळी (बागकामगार) यांना जास्तीचे काम करावे लागल्यास त्यांना अतिकालिक भत्ता (ओव्हरटाईम) देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालिक भत्ता देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर असेल.

२१) कंत्राटदार यांना देण्यात आलेल्या कंत्राटी सेवेबद्दल ते किंवा त्यांचे वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी माळी (बागकामगार) यांना या कार्यालयाकडे कायमस्वरुपी नियुक्ती करिता हक्क मागण्याचा अधिकार राहणार नाही.तसेच कंत्राटी बागकामगार पुरवतांना बालकामगार पुरविण्यांत येणार नाही याची दक्षता घ्यावी.

२२) कंत्राटदार हे कार्यालयात काम करताना त्यांचे नजरेस ज्या काही बाबी येतील त्या कार्यालयीन बाबी आहेत, याची जाणीव ठेवून त्यासंबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवतील. तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही, याबाबतची दक्षता घेतील. गोपनियतेचा भंग झाल्यास सदरचा करार अंशत: अथवा पूर्णत: रद्द करण्यात येईल.

२३) कंत्राटदार हे त्यांच्यावतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी माळी (बागकामगार) यांच्याकडून दररोज वक्तशीरपणे व नियमितपणे या काम करवून घेतील. त्यांची वर्तणुक उच्च दर्जाची राहील. व त्यांचे उत्तरदायित्त्व हे कार्यालयाच्या सर्व हितसंबंधांचे रक्षण करणेच राहिल.
तसेच कंत्राटदाराचेवतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी माळी (बागकामगार) वक्तशीरपणे व नियमितपणे कार्यालयास उपद्रव होणार नाही, याची काळजी घेवून काम करुन घेतील. तसेच माळी (बागकामगार) हे अयोग्य व अपात्र असल्याचे अथवा त्यांचे अशोभनीय गैरवर्तन असल्याचे आढळल्यास त्या माळी (बागकामगार) यांना काढून टाकणे संबंधिचे आदेश देण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

२४) कंत्राटदाराने नेमलेल्या माळी (बागकामगार) यांना काम करताना कोणतीही इजा, अपघात अथवा मनुष्यहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारांची राहिल, त्यास हे कार्यालय कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाहीत.

२५) कंत्राटासंबंधी कोणताही विवाद निर्माण झाल्यास हे कार्यालय नेमतील ते न्यायाधीश लवाद म्हणुन काम पाहतील व १९९६ च्या लवादाच्या कायाद्यानुसार या विवादाबाबत त्यांचा निर्णय बंधनकारक असेल.

२६) कंत्राटदाराने नेमलेल्या माळी (बागकामगार) यांच कडुन सरकारी मालमत्तेचे नुकसान झाले, असे या कार्यालयास आढळून आल्यास कंत्राटदारास देण्यात येणाऱ्या मोबदल्यामधून सदर रक्कम वसूल करण्यात येईल.

२७) कंत्राटदाराने नेमलेले माळी (बागकामगार) व या कार्यालयामध्ये मालक व कर्मचारी, असे संबंध राहणार नाहीत. कंत्राटदार हे पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट, १९३६; एम्लॉईज प्रॉव्हिडन्ट फन्ड ॲक्ट,१९५२, पेमेन्ट ऑफ ग्रच्युईटी ॲक्ट, १९७२; एम्लॉईज कंपेनसेशन ॲक्ट; १९२३, वर्क्स कॉन्ट्रॅक्ट GST टॅक्स् ॲक्ट; मिनिमम वेजेस ॲक्ट, १९४८; इंडस्ट्रीयल डिस्प्युट ॲक्ट, १९४७; चाईल्ड लेबर (Prohibition & Regulation) ॲक्ट १९८, कॉन्ट्रॅक्ट लेबर (Regulation & Abolition) ॲक्ट, १९७० या व सर्व कामगार कायद्यांच्या तरतुदींचे पालन करण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. तसेच सदरच्या उपरोक्त कायद्याच्या परिणामांची जबाबदारी कंत्राटदारावर राहिल. सदरचे काम करण्यासाठी कायद्यानुसार लागणारे सर्व परवाने घेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

२८) कंत्राटदारास अदा करावयाचे देयक प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत त्याकरिता नेमलेल्या समितीने काम योग्यरितीने केल्याबाबतचे प्रमाणपत्र जिल्हा न्यायालय, अकोला येथे जमा केल्यावरच अदा करण्यात येईल.

२९) जिल्हा न्यायालय, अकोला परिसरातील बगिच्याचे सर्व प्रकारची कामे कंत्राटी पद्धतीने करुन घेतल्याबाबतचा मासिक अहवाल असमाधानकारक आढळल्यास कंत्राटदारास मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अकोला यांचे आदेशानुसार खालील "परिशिष्ट – ड" नुसार कार्यवाही करण्यात येईल.

३०) कंत्राटदार यांना एकूण कंत्राटाच्या रकमेच्या ०३% रक्कम जिल्हा न्यायाधीश–०१,अकोला यांचे नावे मुदत ठेव जमा द्वारे किंवा बॅंक गॅरंटीद्वारे दोन वर्षाकरिता सुरक्षा ठेव म्हणून द्यावी लागेल. तसेच त्यांनी कराराच्या कोणत्याही अटी व शर्तींचा भंग केल्यास मुदत ठेव/बॅंक

गॅरंटीची रक्कम जप्त करण्याचा हक्क या कार्यालयास राहिल. सेवाकराराच्या दरम्यान कंत्राटदाराची सेवा असमाधानकारक आढळून आल्यास सदर करार नोटीस देवून रद्द करण्यात येईल आणि सदरचे काम इतर दुसऱ्या एजन्सीकडून कंत्राटदाराच्या जबाबदारीवर व त्याच्या खर्चाने दुसरी व्यवस्था होईपर्यंत करुन घेतले जाईल.

३१) ज्या निविदा स्वीकृत करण्यांत येणार नाहीत, अशा कंत्राटदारांनी बयाना/अनामत रक्कमेचा जमा केलेला Demand Draft/ धनाकर्ष त्यांना सदरहु प्रकरणी स्वीकारलेल्या निविदेस शासनाने प्रशासकीय मान्यता मंजूर केलेनंतर परत करण्यांत येईल व त्यावर कोणतेही व्याज अनुज्ञेय नसेल.

३२) एकुण निविदा किंमतीच्या ८०% पेक्षा खाली असलेली निविदा नाकारण्यांत येईल किंवा तशी निविदा स्विकृत झाल्यास कामाच्या दर्जाबाबत वेगळे हमीपत्र घेण्याचा अधिकार समितीला राहील.

३३) सर्व निविदा या नविन इमारत, कॉन्फरन्स हॉल, चौथा मजला, जिल्हा व सत्र न्यायालय, रामदास पेठ, अकोला येथे दिलेल्या तारखेस व वेळी उघडण्यात येतील.

३४) केवळ निविदा किंवा बयाना/अनामत रक्कम Demand Draft/ धनाकर्ष जमा केला म्हणून कंत्राटावर हक्क सांगता येणार नाही.

३५) कंत्राटदार यांनी कंत्राटादरम्यानच्या काळात वरील अटी व शर्तीचे पालन करील, असे हमीपत्र लिहून द्यावे लागेल.

३६) जिल्हा न्यायालय परीसरात काम उपलब्ध नसल्यास प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हे जेथे सांगतील तेथे बागकाम करावे लागेल.

३७) झाडांची देखभाल व नव्याने फुलझाडे लावुन परिसर स्वच्छ तसेच सुशोभित करण्यासाठी लागणा—या आवश्यक वस्तु जसे की,(पाईप,फावडे,विडा,टिकास,कु—हाड,सब्बल,मोठी गार्डनिंग कैची/कात्री, लहान गार्डनिंग कैची/कात्री, ग्रास कटींग मशिन, जाळीदार झारी, लहान खुरपं, गार्डनिंग ग्लोव्हज, किटकनाशके, खते, तणनाशके, इत्यादी तसेच या व्यतीरिक्त माळी कामासाठी लागणा—या आवश्यक वस्तू/साधनसामुग्री याबाबतचा खर्च हा कंत्राटदार हे करतील.

३८) ज्या कंपनीस/संस्थेस काम सोपविण्यांत येईल त्यांनी त्या बाबतच्या अटी व शर्ती नुसार नोंदणीकृत करारनामा (सहायक दुय्यम निंबधक कार्यालय,अकोला येथे) करणे बंधनकारक राहील व त्याचा संपुर्ण खर्च हा कंत्राटदारास सोसावा लागेल.

परिशिष्ट — ड

अ. क्र.	कामाचा तपशिल/विवरण	दंडाची रक्कम
०१	फुल झाडे व झाडांची व्यवस्थीत देखरेख व निगा न राखल्याचे आढळून आल्यास.	रु.१००/— प्रति दिवस

अकोला
दिनांक : ०१/०७/२०२५

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अकोला